# युरोप २०१९

## स्वित्झर्लंड (विल्डर्सविल)

लंडनहून पहाटे ४ वाजता निघायचं होत, अगोदरच्या अनुभवावरून आधीच टॅक्सी ड्रायव्हरला फोन करून आठवण करून दिली. त्याने आम्हाला काही काळजी करू नका असे आश्वस्त केल्याने जेवल्यावर जास्त गप्पा मारत न बसता लगेच झोपलो. पहाटे सर्व आवरून ४ ला टॅक्सी ड्रायव्हरचा फोन आल्यावर सगळ्या सामानासकट खाली आलो. खालचा दरवाजा बंद करून किल्ली परत ठेवताना २ दिवसापूर्वीच्या किश्श्याची उजळणी होऊन हसू येऊ लागलं. हा टॅक्सी ड्रायव्हर उंच, धिप्पाड ब्लॅक होता, ज्याने आमच्या बॅगा सहजपणे उचलून गाडीत टाकल्या. आम्ही लंडनला घरी पोचेपर्यंत अंधार पडला होता आणि आताही निघताना अजून उजाडायला थोडा अवधी असल्याने अंधारच होता. ज्या साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नाही अशी कोणे एकेकाळी ख्याती असलेल्या देशाचा निरोप आम्ही अंधारातच घेतला.

सकाळी ८ वाजता 'बासेल'ला जायच्या फ्लाईटमधे बसलो आणि एका स्वप्नवत देशात पुढचे ५ दिवस घालवायचे या विचाराने खिडकी बाहेरच्या ढगात हरवून गेलो. ‘बासेल’ विमानतळाबाहेर आलो. इथे एक खूप मोठी मोफत सोय होती ती म्हणजे शटल-सर्विस!! ५० नंबरची बस इथून बासेल रेल्वे स्टेशनला जायला दर १५ मिनिटांनी होती. त्या बसने बासेल रेल्वे स्टेशनला आलो. स्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळच पर्यटकांसाठी माहिती देण्यासाठी मोठा हॉल होता. तिथे कूपन घेऊन तुम्हाला हवी ती माहिती तुम्ही विचारून घेऊ शकता. पर्यटनासाठीच प्रसिद्ध असलेल्या या देशात ही अत्यंत गरजेची गोष्ट होती . अतिशय उपयुक्त माहिती, जसे की जिथे जायचे असेल तिथे जाण्यासाठीचे विविध मार्ग, तिकडचे हवामान, अंदाजे खर्च असे सर्वच तिथे विचारून घेता येते. आम्हाला भूक लागली असल्याने आम्ही आधी तिथे स्टॉलवर सँडविच आणि काही गोड ब्रेड वैगरे खाऊन घेतले. ११ वाजताची इंटरलाकेनला जाणारी गाडी पकडली. स्वच्छ, सुंदर वातावरणातली ती ट्रेन पाहून प्रवासाचा शीण गेला आणि वेगळाच उत्साह संचारला. ट्रेन चालू झाली आणि आम्ही खिडकीबाहेर दिसणाऱ्या नयनरम्य दृश्यात अक्षरशः हरवून गेलो. थोड्याच वेळाने तिकीट तपासनीस आला. आम्ही ८ दिवसाचा स्विस पास काढला असल्याने आम्हाला त्याचा किती फायदा होणार आहे हे समजून येऊ लागले. स्विस पास ३, ४, ६, आणि ८ अशा दिवसांचा मिळतो जो पर्यटकांसाठी अतिशय उपयुक्त आहे. वाटेत स्वित्झर्लंडच्या राजधानीचे शहर ‘बर्न’ही लागले. ‘थुन’ नदीच्या विविधांगी रूपाचे दर्शन पाहून मनाची अतृप्तता वाढू लागली. २। तासांचा अतिशय आरामदायी प्रवास करून

आम्ही इंटरलाकेनला उतरलो. आम्हाला 'वाईल्डर्सविल' या पुढच्या गावी जायचे असल्याने आम्ही स्टेशनवरील माहिती फलक बघू लागलो. इथे सगळी माहिती तुम्हाला त्या फलकांवर लगेच मिळू शकते. कोणाला काहीही विचारायची गरजच नाही. आम्ही 'लाटूरब्रुनेन'ला जाणारी गाडी पकडली. बॅगा चढवायला, उतरवायला आणि ठेवायला गाडीत खास सोय असल्याने खूपच सोपे झाले. अशा प्रकारच्या सोयी बसमधे, गाडीमध्ये, स्टेशनवर पाहून खूपच प्रभावित व्हायला झाले. पुढल्या पाचच मिनिटात आम्ही 'वाईल्डर्सविल'च्या छोटेखानी स्टेशनवर उतरलो. स्टेशन म्हणायचे कारण गाडी थांबली होती आणि एक टुमदार घरासारखं स्टेशनातलं कार्यालय दिसत होत. इथे आम्ही ज्या airbnb च बुकिंग केलं होत ते घर होत इकडच्या पद्धतीचं 'लाकडी शेलेट' आणि त्याचे मालक होते मोनिका आणि रोनाल्डो!! मोनिकाने वेळोवेळी आम्हाला अतिशय उपयुक्त टिपा दिल्या असल्याने तिच्या घरी पोचण्याचा काहीच ताण नव्हता. शिवाय ते घर स्टेशनवरून सुद्धा दिसत असल्याने आम्ही सहजच चालत तिथपर्यंत पोचलो. बाहेरून घर बघूनच आम्ही सगळे खुश झालो. तिथे उभे असतानाच एक पलाझो आणि टी शर्ट मधली छोटी दिसणारी मुलगी बाजूच्या जिन्याने धावत खाली आली आणि हसतच तिने, विनायक? असे म्हणत आमच्या चौघांकडे बघितले. विनायकने पुढे होऊन ओळख दिली तशी तिने वेलकम म्हणून स्वतःचा मोनिका म्हणून परिचय करून दिला. आम्हाला हा एक छान सुखद धक्का होता. तिने दिलेल्या सर्व सूचना कोडनंबर्स वापरून आम्ही घराचा दरवाजा उघडला. लाकडी घरात शिरलो आणि मन खूप प्रसन्न झाले. स्वच्छ, नीटनेटके मांडणी केलेले ते घर होते. कॉम्प्लिमेंटरी म्हणून केक्स, चॉकलेट्स असं बरंच काही टेबलवर ठेवलं होत. २ प्रशस्त बेडरूम्स, मधोमध किचन, त्यात सर्व सोयी, बाजूला एक मोठी बाथरूम आणि सगळ्यात पुढे एक लांबलचक बाल्कनी जिथून समोरची घर, स्टेशन असा सगळंच दिसत होतं,



किचन मधल्या खिडकीतून समोर एक जुनाट पण चालणाऱ्या घड्याळाचा मनोरा होता आणि बाजूला खूप सुंदर सुंदर फुलांची बाग.! मोनिकाचं सुखद स्वागत आणि घरातल्या सुंदर सजावटीने इथले २ दिवस मजेत जाणार ह्याची खात्रीच पटली. घराच्या लाकडी छतावर जुनी भांडी, काही लाकडी हत्यार अशी जुन्या शैलीची सजावट होती त्याचबरोबर जेवणाच्या टेबलवर सुबकसा दिवा, मोठ्या ट्रेमध्ये विविध उपयुक्त असे नकाशे, ट्रेन्स वेळापत्रक, गावात आणि जवळच्या गावात चालणाऱ्या निरनिराळ्या मनोरंजक खेळाविषयी माहिती, दर-पत्रक, केबल-कार पकडण्यासाठीची ठिकाणं अशी भरपूर माहितीपत्रक ठेवली होती. बाजूच्या चौकोनी खणात खेळण्यासाठी पत्ते, छोट्या मुलांसाठी काही खेळणी अशा गोष्टी पर्यटकांसाठी आवर्जून ठेवल्या होत्या. एकूणच ह्या घरासाठी airbnb साईटवर ५ स्टार का होते त्याचे योग्य उत्तर मिळाले होते. आम्ही जेवून छान फ्रेश होऊन गावातच संध्याकाळ घालवायची असा विचार करून बाहेर पडलो. स्टेशनक्रॉस करून समोरच्या सुपरमार्केटमध्ये आधी फिरून त्याच्या वेळा पाहून आणि आजूबाजूचा रहदारीचा रस्ता फिरून आलो. मग पुन्हा घराच्या मागे दिसणाऱ्या डोंगराकडे जायच्या रस्त्यावर फिरू लागलो. गावातून फिरतोय म्हणण्यापेक्षा एखाद्या बागेतून फिरतोय असेच वाटू लागले. प्रत्येक घराबाजूला सुंदर रंगीबिरंगी फुलं आणि काही सजावटीच्या बाहुल्या, प्राणी, पक्षी असे ठेवलेले पाहून या देशातल्या सर्वच लोकांना निसर्गाने तर भरभरून दिलेच आहे पण त्यांची सौन्दर्य दृष्टी पण किती समृद्ध केली आहे ते कळून आले. थोडं पुढे गेलो आणि पाण्याचा आवाज ऐकू येऊ लागला.त्या दिशेने गेलो आणि बघतो तर काय एक खळाळती निळ्या पाण्याने भरलेली नदी लाकडी पुलाखालून धावत सुटली होती. आम्ही सगळेच अवाक झालो. या अचानक दिसलेल्या दृश्याने आम्हाला किती फोटो काढू असे झाले. मनसोक्त फोटो काढून तिथे बराच वेळ बसलो. आजूबाजूला आमच्याशिवाय तसं कोणीच नव्हतं. तेवढ्यात समोर घराच्या खिडकीतून दिसणारा घड्याळ-मनोरा दिसला म्हणून त्या बागेत जावं म्हणून तिकडे शिरलो तर लक्षात आलं की तो एक पूर्वापार जुना मनोरा आहे ज्याच्यासमोर खूप सारी थडगी सुंदर सुंदर फुलांमध्ये पहुडली आहेत. या शांत वातावरणातून पुढे निघालो तर एक छोटी पायवाट डोंगरावर जात होती. तो सायकलिंगचा / चालण्याचा मार्ग होता. त्यावरून चालत पुढे गेलो आणि खाली बघितलं तर एका बाजूला नदी धावत सुटलेली, तिच्या बाजूबाजूनेच वाट काढत रेल्वेचे रूळही आपली गती दाखवून होते आणि त्याच्याच बाजूला रस्ताही दोहो बाजूनी जीवनाचा वेग असाच कायम राहणार ह्याची साक्ष देत होता.



त्यावरून धावणाऱ्या गाड्या जणू नदीच्या प्रवाहाशी स्पर्धा करू पाहत होत्या. कितीही वेळ तिथे घालवला तरी डोळे काही समाधान मानणार नव्हते. त्यामुळे हळूहळू घराकडे चालत निघालो परत. निसर्गाच्या मुक्त उधळणीत आम्हीही रंगून गेलो होतो, वेळेचं भानच उरल नव्हतं. घरी येऊन बाल्कनीमधे बसून मनसोक्त गप्पा मारल्या. समोरच्या घराच्या शेतात एक आज्जी तिच्या नातवंडांकडून काम करून घेत होती, स्टेशनवर थोडीफार लगबग होती गाड्यांची. रात्रीचे ९ वाजत आले तशी सारे थंडावले. दिवस मावळला होता. गावातले दिवे वातावरणाला मंद प्रकाश आणि मंद्र लय देत होते. आम्हीही सुपरमार्केट मधून आणलेले ब्रेड आणि अंड्याचे ऑम्लेट करून खाऊन झोपी गेलो.

सकाळी लवकर उठलो. उत्साहात लवकर आवरून, नेहमीच्या घाईने स्टेशनवर आलो. इथल्या फलकावरून माहिती करून घेतले होते की 'लाटूरब्रुनेन'ला जाणाऱ्या गाड्या दर २० मिनिटाला आहेत. लाटूरब्रुनेन स्टेशन बाहेरच केबलकारची सर्विस आहे. ती पकडून गुटस्चाल्प इथे पोचलो. ह्या सर्व ठिकाणी स्विसपास चालतो. गुटस्चाल्पवरून २ डब्यांची वॅगन कार पकडायला मात्र थोडे चालावे लागते. पण आजूबाजूच्या हिमाच्छादित शिखरांचा आनंद घेत भरपूर फोटो घेत निवांत चालायला खूपच मजा आली. वॅगनकारची सफर पण अशीच आनंददायी होती. मुरेनला आल्यावर तिथेच वेळ घालवायचा का शिलथ्रोनच्या टोकावर जायचं अशा चर्चेतून पुढे केबल कारने शिलथ्रोनपर्यंत जायचं ठरलं. मग केबलकारचा मनसोक्त आनंद घेत खाली

दिसणारी विहंगम दृश्य कॅमेरा आणि डोळ्यात जिथे आणि जेवढे शक्य आहे तसे अधाशासारखे बघत वरती पोचलो. २९७० मी उंचावरील ह्या हिमशिखरावर पोचल्यावर खरंच डोळ्याचे पारणे फिटले.



मुख्य म्हणजे मळभ किंवा पावसाळी हवा नसल्याने आम्हाला खूप वेळ तिथे घालवता आला. इथे जेम्स बॉण्डपटामधल्या काही दृश्यांचे चित्रीकरण झाले असल्याने अधिकचे आकर्षण म्हणजे जेम्स बॉण्डचा कट आऊट आणि आत स्क्रीनवर त्या दृश्याची चित्र दाखवत होते. येताना पुन्हा मुरेनला आलो आणि विचार केला की खाली दुसऱ्या मार्गाने जाऊ. म्हणून मुरेनहुन शीचेलबेर्गला आलो आणि तिथून बस पकडून पुन्हा लाटूरब्रुनेनला आलो. पुन्हा ट्रेन पकडून आमच्या छोट्याशा गावाला पोचलो. जेवढे जाण्याचे ठिकाण आकर्षक तेवढाच प्रवासही सुखकारक!! घरी येऊन जेवलो आराम केला आणि पुन्हा कुठे जायचे यावर हवीहवीशी चर्चा ही केली. ही चर्चा नेहमीच एकमताने संपायची त्यामुळे मजा-मस्करी कायमच चालू असायची. एकाला जास्त चालायचे नसायचे, एकाला ह्यात काय बघायचे असा प्रश्न असायचा तर ट्रिप प्रमुखाला वाटायचे की मी एवढी मेहनत केलीये तर मी म्हणतोय तिकडे जाऊया की!! थोडक्यात काय तर प्रवासातल्या सहवासाची गम्मत ही वाढू लागली होती. मी आणि प्राची स्टेशनवर आल्या आल्या समोर दिसणाऱ्या लाल-लाल, मोठ्या खिडक्यांच्या गाडीच्या प्रेमातच पडलो. जाऊन चौकशी केल्यावर कळले की ही माउंटन ट्रेन अजून १५/२० मिनिटांनी निघून शेन्जेन प्लाटेला जाते. जिथून हीच गाडी परत येते आणि हीच शेवटची गाडी आहे. मग तिथेच परत एकदा कुठे जायचं यावर जोरदार चर्चा झडली आणि अर्थातच आमचा हट्ट पुरवला गेला. त्या गाडीचं अर्धतिकीट द्यावं लागणार होतं कारण स्विसपास मधे अर्धच तिकीट समाविष्ट होत. आम्ही त्या गाडीत बसून पर्वतांची सैर केली. वरती पोचलो. गाडीचे दरवाजे गाडी

चालवणारी महिलाच बाहेरून बंद करायची, उघडायची. तिकीट ही तीच तपासत होती. तिने आमचा दरवाजा उघडून सांगितले की गाडी १० मिनिटातच परत निघणार आहे तेव्हा जास्त लांब जाऊ नका नाहीतर इथेच रात्री राहावं लागेल. मग आम्ही थोडे पाय मोकळे करून आलो आणि लगेच उलट गाडीत बसलो. खेळण्यातल्या गाडीची आठवण करून देणारी ही गाडी आम्हाला क्षणभरात बालपणात घेऊन गेली. लाकडी बाक, वरती दिव्यांची झुंबर, मोठ्यामोठ्या खिडक्या, कमीवेगात धावणारी ही लालचुट्टुक ट्रेन म्हणूनच बाहेरच्या वातावरणाला एक लाघवी प्रसन्नता देत होती. निसर्गातलीच एक होऊन गेली होती. जाता येता दिसणारी डोंगरांची मनोरम चित्रं, वरून दिसणारी खालची छोटी छोटी गावं, नद्या सारं काही कल्पनेपेक्षाही सुंदर भासत होते. जाताना आणि येताना पॅराग्लाइडिंग करणारे खूप लोक दिसत होते. निळ्या आभाळात हे रंगबिरंगी पक्षी फार छान दिसत होते.




पुन्हा एकदा स्टेशनवर उतरलो आणि गावात एक चक्कर मारून परत घरी आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी किती वाजता उठायचं, निघायचं, कसं जायचं याची उजळणी केली आणि रात्री गप्पा मारत विल्डर्सविलची शेवटची रात्र लाकडी, उबदार घरात आनंदात घालवली.

**---- संध्या रानडे**